# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

सत्यमेव जयते

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सारथी

बालचित्रवाणी, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : md.sarthi@maharashtra.gov.in | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in |
|---|---|---|


जा.क्र.सारथी/एमपीएससी/अभिनंदन पत्र/२०२०-२१/ दि.२६/०६/२०२०

प्रति,

श्री. रविंद्र आपदेव शेळके
कल्पना नगर, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

**विषय : MPSC २०१९ राज्यसेवा स्पर्धा परीक्षेतील उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन !**

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणेच्या** पहिल्याच वर्षाच्या राज्यसेवा परीक्षेच्या प्रशिक्षण तुकडी मधील आपण लाभार्थी असून आपल्या यशाने आपण नक्कीच इतर स्पर्धा परिक्षार्थीसाठी एक आदर्श ठेवला आहे. तुमच्या यशामागे तुमची मेहनत व तुमच्या नियोजनाचा महत्वाचा वाटा आहे. तुम्ही तुमच्या उत्तुंग स्वप्नांना उमेदीचे बळ दिले व मेहनतीने व आत्मविश्वासाने **महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०१९** च्या परीक्षेला सामोरे गेलात व यश मिळविले आहे.

तुम्ही सचोटीने व मेहनतीने अभ्यास केल्याने, तुमची उप-जिल्हाधिकारी या पदावर एमपीएससी मार्फत निवड झाली आहे. **तुमच्या यशस्वीतेसाठी सर्वप्रथम आपले हार्दिक अभिनंदन!**

'राज्यसेवा' या शब्दातच आपल्या ध्येयाचा मथितार्थ दडला असून आपण महाराष्ट्र राज्याचे उत्तम व कर्तबगार अधिकारी व राष्ट्राचे नागरिक म्हणून 'सक्षम व प्रेरक' ठराल हा विश्वास आहे.

या देशाचे तुम्ही घटक आहात, त्यामुळे सर्व जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी तुम्ही भविष्यात प्रयत्न करावा ही आशा आहे.

आपल्या पालकांनी जे स्वप्न पाहिले होते, त्यासाठी आपण कठोर मेहनत घेऊन ते स्वप्न पूर्ण केले आहे. आपण आपल्या पालकांचे स्वप्न पूर्ण केल्याबद्दल पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन !

एक कार्यक्षम, प्रामाणिक व लोकाभिमुख अधिकारी म्हणून आपण नावारूपास यावे यासाठी व पुढील वाटचालीस आपणास मन:पुर्वक शुभेच्छा !

अशोककाकडे

**श्री अशोक काकडे (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे**

अ. ज. निंबाळकर

**श्री अजित निंबाळकर (भा.प्र.से.) से.नि.**
**अध्यक्ष**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे**